आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता
२५ एप्रिल २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस/ या टप्प्यात ९६ मतदारसंघात होणार मतदान

- राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध

- ‘टिकटॉक’ ॲपवर बंदी घालणाऱ्या विधेयकावर अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांची स्वाक्षरी

- आयपीएल  क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना  सन रायझर्स हैद्राबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर यांच्यात रंगणार

- **आणि**
- देशाच्या पूर्व आणि दक्षिण भागात पुढचे ५ दिवस तीव्र, ते अतितीव्र स्वरूपाची उष्णतेची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपत आहे. उद्या उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून सोमवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. या टप्प्यात ९ राज्यं आणि

एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ लोकसभा मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मावळ, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड मतदारसंघात मतदान होईल.

या खेरीज उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तेलंगण आणि जम्मू काश्मीरमध्येही चौथ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मध्यप्रदेशात मोरेना इथं पक्षाच्या प्रचारसभेला संबोधित केलं. प्रधानमंत्री कालही मध्य प्रदेशात होते आणि त्यांनी भोपाळमध्ये रोड शोसह सागर आणि बैतुल लोकसभा मतदारसंघातल्या सभांना संबोधित केलं.

निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराने वेग घेतला असून ठिकठिकाणी उमेदवारांसाठी प्रचार सभा होत आहेत. त्याशिवाय प्रचारफेऱ्या, मतदारांच्या भेटीगाठी आणि समाजमाध्यमावरच्या पोस्ट यातून प्रचार सुरु आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल केरळात कोट्टायम इथं प्रचारसभेत केलेल्या भाषणाबद्दल निवडणूक आयोगनं त्यांना नोटीस जारी केली आहे. या भाषणासंदर्भातलं स्पष्टीकरण देण्यासाठी येत्या २९ एप्रिलपर्यंतची मुदत आयोगानं गांधी यांना दिली आहे.

**<><><><><>**

पहिल्या टप्प्यात मतदान झालेल्या नागपूरमध्ये फेरमतदान घेण्याची मागणी ६ अपक्ष उमेदवारांनी केली आहे. नागपूरमधे ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

नागपूरमध्ये १९ एप्रिलला मतदार यादीतल्या गोंधळामुळे ७ लाख लोकांना मतदान करता आले नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे. भाजपा उमेदवार नितीन गडकरी यांनी आचारसंहितेचं उल्लंघन केल्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून जिल्हा निवडणूक आयोगानं आचारसंहिता भंगाच्या तक्रारीची दखलही घेतली नाही असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार काल संपला. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राज्यात अनेक प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या. या टप्प्यात लोकसभेच्या ८८ जागांसाठी १२ राज्यं आणि जम्मू काश्मीर या केंद्रशासित प्रदेशामध्ये उद्या मतदान होणार आहे. मध्य प्रदेशमध्ये बैतुल मतदार संघामधे या टप्प्यात मतदान होणार होतं. मात्र तिथे बसप च्या उमेदवाराचा मृत्यू झाल्यामुळं तिथलं मतदान तिसर्या टप्प्यात घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. ८८ मतदारसंघातले मिळून एकंदर ११९८ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत.

मतदानाच्या दृष्टीनं संबंधित मतदारसंघात जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे.

महाराष्ट्रात उद्या अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड,यवतमाळ-वाशिम अमरावती, वर्धा आणि बुलडाणा या मतदारसंघामधे मतदान होणार आहे. या मतदारसंघात होणाऱ्या मतदानाचा आढावा घेणारा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम मतदानाचा मागोवा उद्या आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर ऐकता येईल.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आज पुण्यात प्रसिद्ध झाला. शपथनामा नावाने प्रसिद्ध झालेल्या या जाहीरनाम्यात जातनिहाय जनगणना, कृषी कल्याण आयोगाची स्थापना, महिलांना नोकऱ्यांमधे ५० टक्के आरक्षण, शिकाऊ उमेदवार महणून नोकरीचा अधिकार, याबरोबरच जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याला पूर्ण पाठिंबा या मुद्द्यांचा समावेश आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेला पक्षाचा विरोध असल्याचंही या जाहीरनाम्यात स्पष्ट केलं आहे. नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी,दहशातवादाविरोधातला युएपीए कायदा इत्यादी कायद्यांचा फेर आढावा घेऊन त्यात बदल करण्याचं आश्वासन पवार गटानं दिलं आहे.

**<><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सातारा लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी काल 'टिकटॉक' ॲपवर बंदी घालणाऱ्या विधेयकावर स्वाक्षरी केली. चीनच्या बाईट-डान्सनं (ByteDance) 'टिक-टॉक' ॲप बाजारातून काढून टाकावं, अथवा अमेरिकन कंपनीला ते विकावं, अशी अट यामध्ये घालण्यात आली असून, त्यासाठी नऊ महिन्यांची मुदत दिली आहे. टिकटॉक ॲपमुळे, चीनी प्रशासनाला वापरकर्त्यांच्या डेटामध्ये शिरकाव

करता येईल, या भीतीमुळे अमेरिकन सिनेटनं काल या वादग्रस्त ऐतिहासिक विधेयकाला मंजुरी दिली.

दरम्यान, हा कायदा असंवैधानिक असून, आपण त्याला न्यायालयात आव्हान देणार असल्याचं टिकटॉक नं म्हटलं आहे.

**<><><><>**

एशिया व्हिडिओ इंडस्ट्री असोसिएशननं मुंबईत आयोजित केलेल्या फ्युचर ऑफ व्हिडीओ इंडिया या परिषदेचं, माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू आणि भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकारणाचे अध्यक्ष अनिल कुमार लाहोटी यांनी आज उद्घाटन केलं.

भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला शंभर अब्ज अमेरिकी डॉलर्सची बाजारपेठ मिळवण्यासाठी चालना देण्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचं उद्दिष्ट असल्याचं संजय जाजू यांनी यावेळी सांगितलं. हा महत्वाकांक्षी दृष्टीकोन साकरण्यासाठी नवोन्मेष आणि विकासाला चालना देऊन या क्षेत्रातल्या नव्या संधींचं भांडवल करण्याचं धोरण अंगीकरल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

उन्हाळी हंगामात मुंबईहून उत्तर भारतात जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेता, रेल्वे प्रशासनानं मुंबई आणि गोरखपुर दरम्यान धावणाऱ्या गाडीच्या २८ अतिरिक्त उन्हाळी विशेष फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रवाशांच्या सोयीसाठी गोरखपुर आणि लोकमान्य टिळक टर्मिनस दरम्यान या गाडीच्या दोन्ही बाजूंनी एकूण २८ फेऱ्या होतील अशी माहिती रेल्वे प्रशासनानं दिली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज संध्याकाळी साडे सात वाजता हैद्राबाद इथं सन रायझर्स हैद्राबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर या संघात सामना होईल.

आयपीएल क्रिकेट सामन्यात काल झालेल्या रोमहर्षक सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं गुजरात टायटन्स संघावर चार धावांनी विजय मिळवला.

**<><><><><>**

दुबईत सुरू झालेल्या २० वर्षांखालील वयोगटासाठीच्या आशियाई अथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताच्या दीपांशु शर्मानं भालाफेकीत सुवर्णपदक पटकावलं. याच स्पर्धेत रोहन यादवनं रौप्यपदक मिळवलं. मुलांच्या पंधराशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रियांशू नं रौप्य पदक मिळवलं तर ऋतिक राठी नं गोळाफेक प्रकारात रौप्य पदक पटकावलं. या स्पर्धेत ६० भारतीय खेळाडूंनी भाग घेतला आहे.

**<><><><><>**

तेलंगणामध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातात १० जण मृत्युमुखी पडले. वरंगळ- खम्मम महामार्गावर काल रात्री एका दुचाकीने खासगी बसला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला, तर आज पहाटे सूर्यपुर जिल्ह्यात दुर्गापुरम इथं राष्ट्रीय महामार्गावर एका चारचाकी वाहनानं ट्रकला धडक दिल्यानं झालेल्या आणखी एका अपघातात ६ जण मृत्युमुखी पडले, तर ४ जण जखमी झाले.

उत्तरप्रदेशमध्ये काल रात्री एका कार चालकाचा वाहनवरचा ताबा सुटून झालेल्या अपघातात ४ जण मृत्युमुखी पडले.

**<><><><><>**

गुन्ह्यांचा तपास जलद गतीनं करण्याच्या उद्देशानं देशात तांत्रिकदृष्ट्या प्रगत न्यायवैद्यक प्रयोगशाळांची संख्या वाढवण्याची गरज असल्याचं राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं म्हटलं आहे. न्यायवैद्यक आणि तपास विभाग या दोन्ही विभागांचे काम एकत्रित तपास प्रक्रियेचा भाग बनण्याची आवश्यकता आहे, असं प्रतिपादन मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधीश अरुण कुमार मिश्रा यांनी केलं.

**<><><><><>**

देशाच्या पूर्व आणि दक्षिण भागात पुढले ५ दिवस तीव्र, ते अतितीव्र स्वरूपाची उष्णतेची लाट राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. ओदिशाचा किनारपट्टी भाग, पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला आणि हिमालय पर्वतरांगांचा प्रदेश, सिक्कीम आणि कर्नाटकच्या अंतर्गत भागात अति-तीव्र उष्णतेची लाट, तर बिहार, झारखंड, आंध्रप्रदेशचा किनारपट्टी भाग, तेलंगणा आणि पूर्व उत्तरप्रदेशमध्ये उष्णतेची लाट राहील, असा अंदाज आहे.

ईशान्य भारतात २६ ते २८ एप्रिल दरम्यान पावसाची शक्यता आहे. या काळात अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा मध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तसंच येत्या शनिवारी आणि रविवारी ईशान्य भारतात सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**